प्रेस नोट दि.१७/०८/२०१९

---

## खडक पोस्टे तपास पथकाची कामगिरी

## सराईत वाहन चोराला अटक करुन ७ वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस

सदर बाबत अधिक माहिती अशी की, खडक पोलीस स्टेशन तपास पथकातील अधिकारी/कर्मचारी हे खडक पोलीस स्टेशन ला हजर असतांना पो. शि. समीर माळवदकर, पो. शि. संदिप कांबळे यांना त्यांचे बातमीदाराने बातमी दिली की, काही दिवसांपुर्वी सुमारे पाच दिवसापुर्वी टिंबर मार्केट येथुन रिक्षा चोरुन घेऊन जाणारा इसम आज रोजी त्याचे लोहियानगर येथील घरी आला आहे अशी खात्रिशीर माहिती सांगुन त्याचे वर्णन सांगीतले. त्याप्रमाणे सदरची बातमी मा. भरत जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक खडक पोलीस स्टेशन पुणे यांना कळवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली सदर ठिकाणी तपास पथकाचे कर्मचाऱ्यासह सापळा लावण्यात आला. बातमीचे वर्णना्प्रमाणेचा इसम हा लोहिया नगर येथे असल्याचे सर्व स्टाफना दिसल्याने त्यास स्टाफचे मदतीने ताब्यात घेण्यात आले त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव **अल्फेश शरीफ मुलाणी, वय २३ वर्षे, रा. ५४/ ईपी/ लोहियानगर, रमेश बागवे यांचे ऑफिस शेजारी, पुण** असे सांगितले. त्याचेकडे दाखल बातमीचे अनुषंगाने चौकशी करता तो प्रथम उडवा उडवी उत्तरे देवुन लागल्याने त्यास विश्वासात घेवुन अधिक तपास करता त्याने बातमी प्रमाणे रिक्षा चोरल्याचे कबुल केले. सदर बाबत खडक पोलीस स्टेशन कडील गुन्हे अभिलेख तपासला असता गुन्हा रजि.नं. ३२७/२०१९, भा. दं. वि. क. ३७९ प्रमाणे दाखल आहे.

सदर आरोपी याचेकडे वाहनचोरीचे अनुषंगाने अधिक तपास करत असताना त्याने पुणे परिसरातुन विविध ठिकाणाहुन वाहने चोरलेली असल्याचे निष्पन्न झाले. सदर आरोपी याचेकडुन अधिक तपासादरम्यान **(१)** ४५,०००/-रु. कि. ची ॲटो रिक्षा क्र.एम एच १२ ए यु ७७४३ **(२)** २२,०००/- रु किं ची बजाज डिस्कव्हर एम एच १२ जी क्यु ६५७६ **(३)** १८०००/- किं ची एक सुझुकी एक्सेस एम एच १२ ई के ६८८३ **(४)** ८०,०००/- रु किं ची एक रिक्षा क्रमांक एम एच १४ ए एस २२३० **(५)** ६०,०००/- रु किं ची एम एच १२ ए यु १४८४ **(६)** ३५,०००/- रु किं ची एक ॲक्टीव्हा एम एच १२ एफ डब्ल्यु ९४३१ **(७)** ५०,०००/- रु किं ची एक बजाज पल्सर एम एच १२ एल एफ ५४१५ असा **एकुण मिळुन ३,१०,०००/- रु किं चा माल मिळुन आल्याने तो हस्तगत करण्यात आला आहे.**

सदर गाडयाचे इंजीन व चॅसी नंबर चे आधारे तपास केला असता पुढीलप्रमाणे ०७ गुन्हे उघडकिस आले आहेत.

**१) खडक पोलीस स्टेशन गुरनं ३२७/२०१९ भादवि क ३७९**
**२) खडक पोलीस स्टेशन गुरनं ३३६/२०१८ भादवि क ३७९**
**३) खडक पोलीस स्टेशन गुरनं २८८/२०१९ भादवि क ३७९**
**४) दत्तवाडी पोलीस स्टेशन गुरनं २५४/२०१६ भादवि क ३७९**
**५) सहकारनगर पोलीस स्टेशन गुरनं ३३३/२०१९ भादवि क ३७९**
**६) कोथरुड पोलीस स्टेशन गुरनं २७४/२०१९ भादवि क ३७९**
**७) अलंकार पोलीस स्टेशन गुरनं १८८/२०१९ भादवि क ३७९**

वर नमुद सर्व कारवाई ही श्री श्रिकांत तरवडे, अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे , श्रीमती. स्वप्ना गोरे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ व श्री. प्रदिप आफळे ,सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन चे श्री. भरत जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उत्तमराव चक्रे पोलीस निरीक्षक (गुन्हे) तपास पथकाचे प्रभारी सहा पोलीस निरीक्षक श्री.उमाजी राठोड, पोलीस कर्मचारी, विनोद जाधव, गणेश सातपुते, संदिप पाटील, प्रमोद नेवसे, राकेश क्षिरसागर, समीर माळवदकर, संदिप कांबळे रवी लोखंडे, विशाल जाधव, रोहन खैरे, इम्रान नदाफ, सागर केकान यांचे पथकाने केली आहे.

17/8

(भरत जाधव)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खडक पोलीस स्टेशन पुणे